शब्दांना सत्याची धार

प्रहार

मुंबई ■ शुक्रवार, १६ फेब्रुवारी २०१८ ■ RNI Reg.No .: एमएएचएमएआर/२००५/१८६८१ वर्ष १४ ■ अंक १२४ ■ पाने १२ (मुंबई प्रहारसह) ■ ₹ ४.०० www.prahaar.in

नीरव मोदीच्या मालमत्तेवर छापे; मुंबईतील घर सील

मुंबई (प्रतिनिधी) : सार्वजनिक क्षेत्रातील दुसऱ्या क्रमांकाची बँक असलेल्या पंजाब नॅशनल बँके (पीएनबी) ला ११ हजार ४०० कोटी रुपयांचा गंडा घालणारा अब्जाधीश हिरे व्यापारी नीरव मोदी आणि अन्य तिघे देश सोडून फरार झाले आहेत. पीएनबीतील घोटाळा उघडकीस आल्यानंतर गुरुवारी या बँकेच्या शेअरमध्ये मोठी घसरण झाली. सक्तवसुली संचलनालयाने (ईडी) घोटाळ्याचा सूत्रधार नीरव मोदीची मुंबईसह तीन शहरांतील कार्यालये आणि निवासस्थानांवर छापे टाकून पाच हजार शंभर कोटींचे हिरे जप्त केले आहेत. नीरव मोदी, त्याची आई आणि भावाविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला असून सीबीआयला लूकआऊट नोटीस जारी करण्यास सांगितले आहे.

- पंजाब नॅशनल बँक घोटाळाप्रकरणी ईडीची कारवाई
- नीरवसह तिघे देश सोडून फरार

पाच हजार शंभर कोटींचे हिरे जप्त

दरम्यान, आम्ही कोणत्याही चुकीच्या गोष्टीला खतपाणी घालणार नाही. आम्हाला थोडा वेळ द्या, बँक पूर्ण क्षमतेने दोषींवर कारवाई करत आहे, ग्राहक असो वा कर्मचारी गैरव्यवहार करणाऱ्या प्रत्येकावर कारवाई करणार असल्याचे पंजाब नॅशनल बँकेकडून व्यवस्थापकीय संचालक सुनील मेहता यांनी गुरुवारी दिल्लीत घेतलेल्या पत्रकार परिषदेत स्पष्ट केले.

कारवाईच्या भीतीने नीरव मोदीने स्वित्झर्लंडमध्ये पळ काढल्याचे समजते. पंजाब नॅशनल बँकेच्या मुंबईतील ब्रिच कँडी शाखेत हा घोटाळा झाल्याचे बुधवारी उघड झाले होते. हिरे व्यापारी नीरव मोदीने आपल्या मित्रांच्या सहाय्याने पीएनबीला गंडा घातल्याचा आरोप आहे. पीएनबीतील अधिकाऱ्यांशी संगनमत करूनच हा घोटाळा करण्यात आल्याची शक्यता आहे.

/...२

नीरव मोदीचे ईडीने सील केलेले घर. (छाया : अरुण पाटील)

राहुल गांधींची बोचरी टीका

नरेंद्र मोदींना मिठी मारा, १२ हजार कोटी रुपये लुटा हेच नीरव मोदीचे सूत्र होते, अशी बोचरी टीका राहुल गांधी यांनी केली आहे. पीएनबीतील घोटाळा प्रकरणावरून राहुल गांधी यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदींवरच निशाणा साधला आहे. ट्विटमध्ये राहुल गांधी म्हणतात, देशाला लुटण्याचे नीरव मोदीचे साधे सूत्र होते. पहिले म्हणजे मोदींना मिठी मारा. दुसरे म्हणजे त्यांच्यासोबत दाव्होसमध्ये फिरा आणि त्यानंतर देशातील १२ हजार कोटी रुपये लुटा. त्याने देखील तपास यंत्रणांनी शोध सुरू करताच विजय मल्ल्यासारखे देशातून पलायन केले, याकडेही राहुल गांधींनी लक्ष वेधले.

पान २ वर...

- घोटाळ्यातील दुसरे मोदी
- प्रियंका चोप्राने करार तोडला
- नीरव मोदीचे भाजप कनेक्शन
- अंबानी कुटुंबाशी नातेसंबंध



घोटाळेबाज नीरव मोदीचे मुंबईतील काळा घोडा येथील कार्यालय.

बँक सक्षम, खातेदारांनी निश्चिंत राहावे : मेहता

पीएनबीतील घोटाळा समोर आल्यानंतर बँकेचे व्यवस्थापकीय संचालक सुनील मेहता यांनी नवी दिल्लीत पत्रकार परिषद घेऊन ग्राहकांना दिलासा देण्याचा प्रयत्न केला. त्यांनी सांगितले की, बँक कोणत्याही चुकीच्या गोष्टीला खतपाणी घालणार नाही. ग्राहक असो वा कर्मचारी, गैरव्यवहार करणाऱ्या प्रत्येकावर कारवाई केली जाणार आहे. २०११ मध्ये घोटाळ्याची माहिती मिळाली तेव्हा संबंधित यंत्रणांना माहिती दिली आणि चौकशी सुरू केली होती. बँकेची विश्वासार्हता धोक्यात आणणार नाही, त्यामुळे खातेदारांनी निश्चिंत राहावे, प्रत्येक दोषींवर बँक कारवाई करण्यास सक्षम असल्याचे मेहता यांनी स्पष्ट केले.

सिंधुदुर्गात परप्रांतीय बोटींची घुसखोरी

सरकार काय करत आहे?

नारायण राणे कडाडले

मालवण (प्रतिनिधी): भाजप-शिवसेना युती सरकारबरोबरच येथील लोकांनी निवडून दिलेले शिवसेनेचे आमदार, खासदार आणि पालकमंत्री यांचे सिंधुदुर्गच्या किनारपट्टीवर लक्ष राहिलेले नाही. मुळात त्यांच्यामध्ये कोणताही दम नसल्यामुळे मच्छीमारांवर अन्यायाची ही परिस्थिती ओढावली आहे. प्रशासकीय यंत्रणा आणि राज्यकर्त्यांच्या डोळ्यांदेखत परप्रांतीय हायस्पीड नौका बेकायदेशीरपणे घुसखोरी करत आहेत व इथल्या मासळीची लूट करत आहेत. त्यामुळेच सिंधुदुर्गातील मच्छीमार देशोधडीला लागला आहे. शासनाच्या नाकर्तेपणामुळे स्थानिक मच्छीमारांनी परप्रांतीय नौकांविरोधात आंदोलन छेडले तर शासकीय यंत्रणा त्यांच्याविरोधात दरोडा आणि खंडणीसारखे अजामीनपात्र गुन्हे दाखल करत आहे. हे कृत्य निषेधार्ह आहे. गोव्याचे मुख्यमंत्री आपल्या राज्यातील ट्रॉलरवाल्यांसाठी सिंधुदुर्गातील प्रशासनाला कामाला लावतात तर आमचे सरकार काय करत आहे? असा सवाल महाराष्ट्र स्वाभिमान पक्षाचे संस्थापक अध्यक्ष तथा माजी मुख्यमंत्री नारायण राणे यांनी केला. दरम्यान, या प्रश्नावर मुख्यमंत्री तसेच मत्स्यव्यवसाय मंत्र्यांची भेट घेऊन आपण चर्चा

तीव्र आंदोलनाचा इशारा

/...२

मालवणमध्ये गुरुवारी स्थानिक मच्छीमारांना धीर देताना महाराष्ट्र स्वाभिमान पक्षाचे संस्थापक अध्यक्ष नारायण राणे.

अमेरिकेत गोळीबार

पार्कलंड - साऊथ फ्लोरिडाच्या डगलस हायस्कूलमध्ये एका माजी विद्यार्थ्याने फायरिंग केले. त्यात १७ जणांचा मृत्यू झाला आहे. मृतांमध्ये अनेक विद्यार्थ्यांचा समावेश आहे. सुमारे १४ जण जखमी झाले आहेत. आरोपी निकोलस क्रूजचे वय १९ वर्षे आहे. तो याच शाळेचा माजी विद्यार्थी आहे. पोलिसांनी त्याला अटक केली आहे. घटनेतील मृतांचा आकडा वाढण्याची शक्यता आहे.

१७ ठार, १४ जखमी

न्यूज एजन्सीच्या मते ही घटना मियामीपासून

/...२

मनसेतून शिवसेनेत आलेल्या नगरसेवकांची 'स्थायी'त वर्णी?

सातमकर व चेंबूरकर यांच्या राजीनाम्यानंतर शक्यता वाढली

मुंबई (प्रतिनिधी) : शिवसेनेतून मनसेत प्रवेश करणाऱ्या सहा नगरसेवकांनी घरवापसी करताना पुन्हा शिवसेनेत प्रवेश केला. यातील दोघांची स्थायी समितीत वर्णी लागण्याची शक्यता बळावली आहे. स्थायीचे सदस्य मंगेश सातमकर आणि आशीष चेंबूरकर यांनी राजीनामा दिल्याने त्यांच्या जागेवर दोघांची वर्णी लागण्याची शक्यता वर्तविली जात असताना शिवसेनेतील गटबाजीमुळे चेंबूरकर आणि सातमकर यांनी राजीनामा दिल्याचेही बोलले जात आहे.

दिलीप लांडे, परमेश्वर कदम

/...२

जेएनपीटी स्थानिक जनता आणि प्रकल्पग्रस्त व्यक्तींना रोजगार प्रदान करण्यासाठी वचनबद्ध आहे

जेएनपीटी समावेशक वृद्धीसाठी ठामपणे वचनबद्ध आहे, तसेच स्थानिक जनतेला जास्तीत जास्त रोजगार प्रदान करण्यात येणार आहे. पोर्टने प्रकल्पग्रस्त व्यक्तींच्या रोजगाराकरिता सुस्थित संपूर्ण पारदर्शक प्रणाली तयार केली आहे. जेएनपीटी प्रकल्पग्रस्त व्यक्तींना आवश्यक कौशल्य प्राप्त होण्याकरिता आणि स्थानिक जनतेच्या उद्योगाच्या वैविध्यपूर्ण आवश्यकता पूर्ण करण्याकरिता उत्कृष्टतेचे केंद्र स्थापित करीत आहे .

त्यांच्या विविध प्रकल्पाच्या माध्यमातून, स्थानिक समुदायाला रोजगार निर्मिती आणि समृद्धता, पर्याप्त आर्थिक क्रियाकलापकडे नेणाऱ्या अर्थव्यवस्थेच्या मूल्य साखळीला स्थापित करण्याचे पोर्टचे उद्दिष्ट आहे.

१. जेएनपीटीने उमेदवार आणि त्यांच्या कुटुंबातील सदस्यांना सुयोग्य संधी देणाऱ्या ३ वर्गवारीची निर्मिती करून प्रकल्पग्रस्त आणि स्थानिक जनतेच्या भरतीसाठी एक पारदर्शी आणि स्पष्ट आराखडा तयार केला आहे.
२. पीएसए टर्मिनलमध्ये प्रकल्पग्रस्तांच्या रोजगाराची ही फक्त सुरवात आहे, जशी फेज २ च्या विकासाची सुरवात आणि फेज १ च्या परिचालनाची सुरवात होईल तशा रोजगाराच्या अधिक संध्या निर्माण होतील.
३. जेएनपीटी-सेजला प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्षपणे १.२५ लाख लोकांना रोजगार प्रदान करणे अपेक्षित आहे.
४. आगामी एनएमआयए विमानतळ आणि सेज करीता विविध विषयामध्ये तांत्रिक प्रशिक्षण देण्याकरिता जेएनपीटी-सिडको मल्टी स्किल डेव्हलपमेंट सेंटर विकसित करणार आहे.

आजतागायत जेएनपीटी आणि संलग्न टर्मिनस द्वारा निर्मित रोजगार खालीलप्रमाणे

टर्मिनल	स्टाफ संख्या	रोजगार मिळालेले पीएपी	कंत्राटावर
जेएनपीटी	१५६९	९०७	८४०
जीटीआय	४६६	१६९	७५०
एनएसआयसीटी/ एनएसआयजीटी	६३४	९०	९८५
पीएसए	१६५	५२	३४०*

*कंत्राटावर भरती केल्या जाणाऱ्या व्यक्ती

प्रशासकीय इमारत, शेवा, नवी मुंबई - ४०० ७०७, फॅक्स : ०२२-२७२४ ४०२०,
११०७, रहेजा सेंटर, फ्री प्रेस मार्ग, नरीमन पॉईंट, मुंबई - ४०० ०२१, फॅक्स : ०२२-६७४३ १११६
marketing@jnport.com | www.jnport.gov.in | अधिक माहितीसाठी जेएनपीटीच्या १८००४१९०२८१ ह्या हेल्पलाईन नं. वर संपर्क करा.
आम्हाला फॉलो करा: JNPORT / JNPort / JNPTPort

जने पन्यास JNPT

डोकेदुखीने हैराण प्रजा पेनबाम करी काम राजा

उन्हाळा, सर्दी, थंड पाणी ह्या सर्व कारणांमुळे आज आपण डोके दुखीने होता बेजार अहिल्या आयुर्वेदिकने संशोधन करून एक साधा सोपा उपाय केला आहे सादर

'खो-गो' (आयुर्वेदिक) पेनबाम

एकदा वापरून पहा, तुम्हीही म्हणाल 'खो-गो' पेनबाम करी काम राजा.

'खो-गो' (आयुर्वेदिक)

अहिल्या आयुर्वेदिक औषधायलय, मुंबई ६३.
मोबाईल ९१-८१०८६८०००९ ● सर्वत्र उपलब्ध

वितरणी / क्री

मनोहर पर्रिकर लीलावतीत दाखल

मुंबई : गोव्याचे मुख्यमंत्री मनोहर पर्रिकर यांना पोटदुखीचा त्रास होऊ लागल्याने मुंबईतील लीलावती रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. विषबाधेमुळे त्यांना त्रास होत होता. आता प्रकृती सुधारत आहे.

सोने-चांदी

सोने (प्रति १० ग्रॅम) : २९,५६७
चांदी (प्रति १ किलो) : ३८,५४७

तापमान

कमाल : ३४ अंश सेल्सिअस
किमान : २५ अंश सेल्सिअस

हवामान : आकाश निरभ्र राहील.

बडोद्यात आजपासून सारस्वतांचा मेळा

पूर्वसंध्येला ग्रंथदिंडीद्वारे साहित्य संस्कृतीचे अनोखे दर्शन

बडोदा : ९१ वे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन बडोद्यात शुक्रवारपासून बडोदा येथे सुरू होत आहे. त्याच्या पूर्वसंध्येला गुरुवारी सायंकाळी ग्रंथदिंडी काढून प्रारंभ करण्यात आला. माजी सनदी अधिकारी असलेल्या साहित्यिक लक्ष्मीकांत देशमुख यांचे अध्यक्षतेखाली होत असलेले बडोद्यातील हे चौथे साहित्य संमेलन आहे. यापूर्वी १९०१ मध्ये सातवे संमेलन, १९२१ मध्ये अकरावे संमेलन आणि १९३४ मध्ये विसावे संमेलन बडोद्यात झाले होते.

१६, १७ आणि १८ फेब्रुवारी असे तीन दिवस हे साहित्य संमेलन चालणार आहे. या संमेलनाचे अध्यक्ष माजी सनदी अधिकारी लक्ष्मीकांत देशमुख आहेत. या संमेलनाच्या तयारी वरून सध्या अंतिम हात फिरवला जात आहे. या संमेलनात कार्यक्रमांची रेलचेल असणार आहे. बोलीतील कविता असं मराठीच्या वऱ्हाडी, अहिराणी, कोकणी अशा विविध बोलीतील काव्य संमेलन होणार आहे. तर नागर ते नांगर या विषयावर एक टॉक शो घेतला जाईल. तसंच कथालेखकांचे आयुष्य त्यांच्या कथेच्या विश्वाचा वेध घेणाराही एक कार्यक्रम आयोजित

/...२

आता कोलगेट 100 ग्रॅ. पॅक

~~₹52~~ ₹46/-*

*एमआरपी सर्व करांसहित. जीएसटी मुळे किंमतीत कपात.

Colgate